# -:: प्रकरण - एक ::-

## पेशवेपूर्वकालीन महाराष्ट्रातील धंदे व व्यवसाय

# प्रकरण - एक

## पेशवेपूर्वकालीन महाराष्ट्रातील धंदे व व्यवसाय

### प्रास्ताविक :

प्राचीन काळापासुन महाराष्ट्रात बरेच धंदे व व्यवसाय अस्तित्वात होते. समाजाच्या विविध गरजा भागविण्यासाठी विविध धंदे व व्यवसायाची उत्पत्ती झाली. अन्न धान्याचा प्रमुख प्रश्न सोडविण्यासाठी शेतीचा उदय झाला. शेती आणि शेतक-या-च्या अनेक गरजा पु-या करण्यासाठी अनेक धंद्यांचा उगम झाला. महाराष्ट्रातील विविध धंदे व व्यवसायाचे स्वरुप पहाण्या अगोदर धंदा व व्यवसाय या संकल्पनाचा अर्थ स्पष्ट करणे गरजेचे आहे.

धंदा किंवा व्यवसाय म्हणजे आर्थिक गरजा भागविण्यासाठी व्यक्ती जे श्रम करीत असेल किंवा जी सेवा देत असेल त्या श्रमाला व सेवेला धंदा किंवा व्यवसाय म्हटले जाते. श्रमाच्या वा सेवेच्या मोबदल्यात व्यक्तीला पैशाच्या रुपात वा इतर गोष्टींच्या स्वरुपात मोबदला मिळतो. धंदा व व्यवसाय या दोन कल्पनात एक छोटासा फरक आढळतो. व्यवसाय म्हणजे उच्च प्रतिचा धंदा होय. " The Twentieth Century English Marathi Dictionary " या शब्दकोशात Profession या शब्दाचा अर्थ व Superior Kind of occupation म्हणजेच उच्च धंदा, पेशा, वृत्ती, सुशिक्षिताचा धंदा

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

असा दिला आहे. उदा. वैद्यकी, वकिली, शिपाईबाणा इत्यादींना व्यवसाय म्हटले आहे. यावरुन धंदा आणि व्यवसाय हे शब्द ब-याच वेळा समान अर्थाने वापरलेले दिसुन येतात.[१]

शेती व्यवसाय हा प्राचीन काळापासून आजतागायत महत्वाचा व्यवसाय मानला गेला आहे. प्राचीन महाराष्ट्रात शेती व्यवसायाला बरेच महत्व प्राप्त झाले होते. बहुसंख्य लोकांचे जीवन हे शेतीवर अवलंबून आहे अशी लोकांची धारणा होती.[२]

साधारणत: शंभर सव्वाशे उंबरे असलेले खेडे ग्राममध्यभागी, त्याच्याभोवती पिकाउ जमीन, तिच्यापलीकडे गुराना चारण्यासाठी कुरणे व त्या पलीकडे जंगले, अरण्ये अशी त्यावेळी ग्रामप्रदेशाची रचना असे.[३]

शेतकरी साध्या लोखंडी नांगरानेच शेती नांगरत असत आणि त्यासाठी बैलाचा आणि टोणग्याचा वापर करीत असत. सामान्य शेतक-याकडे दोन चार एकर जमीन असे. कांही श्रीमंताकडे एक हजार एकरापर्यंत देखील जमीन असे. भुमीहीन शेतमजूरही त्याकाळी होते. शेतकरी नांगरणी, कुळवणी, पेरणी करीत असत आणि स्त्रिया घर सांभाळत असत. शेतकरी साधारणपणे तांदुळ, तूर, गहू, हरभरा, मूग, मसुरा इत्यादी पीके घेत असत. तसेच तिळ, मोहरी, जव इत्यादींचेही उत्पन्न घेतले जाई. कापूस, ऊस ही व्यापारी पीके शेतकरी घेत असत.[४]

तांदुळ हे पीक महत्वाचे ए पीक होते. या पीका विषयी माहिती "गाथासप्तशती" या ग्रंथात मिळते. या ग्रंथात साळीप्रकारचा तांदुळ हा पावसाळ्यात होत असे असा उल्लेख आहे.[५] याशिवाय कलम-कोळंबी, साळी, व्रीही अशीही तांदळांची नावे आढळतात.[६] तांदळांची कांही पीके एक महिन्यात येणारी होती. त्यामध्ये कुमुदभणीका नावाचा तांदुळ एक महिन्यात येत असे आणि हे पीक प्राचीन महाराष्ट्रात अपरांत किंवा उत्तर कोकण या भागामध्ये घेतले जाई असा उल्लेख आहे.[७] तांदळाच्या पीकाबरोबर " लवंग " इत्यादी पीके विंध्यपर्वताच्या कांही भागात घेतली जात असत. नर्मदेच्या परिसरात तिळ आणि तिळाचे तेल तयार होत असे. गोदावरीच्या खो-यात रजीक जातीच्या मोहरीचे उत्पादन केले जाई असा उल्लेख गाथासप्तशती मध्ये आहे. गोदावरीच्या खो-यात "यव" नावाच्या खाद्यधान्याचे उत्पादन होत असे.[८]

शेतीच्या व्यवसायात प्राचीन महाराष्ट्रात अनेक पीके घेतली जात. त्यामध्ये कापसाच्या पिकाचा उल्लेख होतो. कापसाचे पीक हे अपरांत म्हणजे उत्तर कोकण आणि नर्मदेच्या काठावरील कांही भागातून घेतले जात असे. महाभारतात देखील कापुस उत्पादनात अपरांत किंवा उत्तर कोकणाचे महत्व वर्णिलेले आहे.[९]

प्राचीन महाराष्ट्रात उसाचे पीकही घेतले जात असे. " गाथा-सप्तशती " या ग्रंथात उसाचा रस हा गुळ यांत्रीका द्वारे काढला जात असे. असा उल्लेख आहे. नारळाच्या झाडाचाही उल्लेख सापडतो. नाशिक येथील शिलालेखात नारळा विषयी माहिती मिळते. नारळाचे उत्पादन मुख्यत: किनारपट्टीवर होत असे.[१०]

प्राचीन महाराष्ट्रातील या पीकाबरोबर अनेक झाडाचेही उल्लेख सापडतात. जु जुन्नरच्या लेखात ताडाची झाडे लावण्यासाठी जमीनीचे इनाम दिले होते असा उल्लेख सापडतो.[११] हयुएनत्संगने कोंकणात ही ताडझाडे पाहीली. ताडझाडे प्रामुख्याने किनारपट्टीवर होत होती अशी माहिती तो देतो.[१२] "गाथासप्तशती"त आंब्याच्या झाडाचे उल्लेख सापडतात. आंब्याच्या झाडाचे उल्लेख हे कांही शिला-लेखातून दिसून येतात. जुन्नर येथील शिलालेखात आंब्याच्या झाडाचा उल्लेख आहे.[१३]

प्राचीन काळातील शेती पावसाच्या पाण्यावर होई. विहीरीचे पाणी शेतीला वापरल्याचे क्वचीत उल्लेख आहेत. परंतु कालवे आणि पाटबंधारे यांचा उल्लेख आढळत नाही. तेंव्हा शेतीसाठी पाण्याच्या सोयींची फारसी प्रगती झाली नसावी असे वाटते.[१४]

प्राचीन काळाप्रमाणे शेती व्यवसाय यादवकाळात सुध्दा महत्वाचा गणला गेलेला होता. खेडयामधून रहाणा-या लोकांचा प्रमुख व्यवसाय हा शेती आणि पशुपालन होता. गावातील जमीनीवर ग्रामस्थ शेतक-याची मालकी असल्यामुळे गाव सोडून इतरत्र जाण्याचे त्यांना कारण नव्हते.[१५] मजुरानी निष्ठेने काम करावे म्हणून आणि मालकानी दिलेली औत, मोट , दोर, नांगर, चाडे वगैरे अवजारे आपली स्वत:ची आहेत अशी जपण्याचे नैतिक बंधन असे. तसेच उत्पन्ना पैकी दोन हिस्से मालकाचे आणि तिसरा हिस्सा कुळाचा असे प्रमाण होते. परंतु कांही ठिकाणी पीक कितीही आले तरी दर नांगरामागे आणि बैलजोडी मागे ठरलेला खंड नियमीत द्यावा लागे.[१६]

शेती व्यवसाय हा प्रधान व्यवसाय असल्यामुळे दुष्काळाचे संकट म्हणजे ग्रामीण भागातील आर्थिक जीवनातील महत्वाची समस्या होती. त्यासाठी यादवकाळात दुष्काळासारख्या संकटाना तोंड देण्यासाठी धनिक लोक पाणीपुरवठयाच्या योजनाना आर्थिक सहाय्य करीत असत.[१७]

यादवकालात जनावरापासून पिकांचे रक्षण केले जाई आणि पिके चोरुन नेणा-यावर लक्ष ठेवले जाई. पिकात शिरुन चो-या केल्याची कांही उदाहरणे लिळा चरित्रात सापडतात.[१८]

यादवकाळातील शेतक-याना जमीनीवरील कर हा धान्याच्या रुपात द्यावा लागे. परंतु अवर्षणाच्या काळात करात सूट मिळे.[१९] यादवकाळात शेतजमिनीची खरेदी विक्री कांही प्रमाणात होत असे.[२०]

प्राचीन आणि यादव काळाप्रमाणे शेतीचा व्यवसाय शिवकाळात सुध्दा महत्वाचा मानलेला होता. सतराव्या शतकात यादवकाळाप्रमाणे खेडे हे आर्थिक व्यवहाराचे केंद्रबिंदु होते. शेती व्यवसाय हाच जीवनाचा खरा मार्ग असल्याने बहुतांशी लोक प्रामुख्याने शेतीवर अवलंबुन असत.[२१]

शेतक-यांना गावामध्ये कुणबी, मजुरी, राया व कुलवाडी या नावाने ओळखले जाई. शेती व्यवसाय हा सतराव्या शतकात महत्वाचा असला तरी अनेक राजकीय घडामोडी, पावसाची अनिश्चितता, नेहमीच्या युध्दाचा प्रसंग, आर्थिक मदतीचा अभाव इत्यादी अनेक कारणाने शिवकाळातील शेती आणि शेतकरी हे मागासलेल्या अवस्थेत होते.[२२]

शिवकाळातील शेतक-याची आर्थिक स्थिती ही कुळवाची संख्या आणि नांगरांची संख्या यावर अवलंबुन असे. शेती अवजारे तयार करुन घेण्यासाठी शेतकरी लाकुड देउन गावातील सुतार, लोहार यांच्याकडून शेती अवजारे बनवून घेत असत. तसेच शेतीसाठी लागणारी बी-बियाणे घेण्यासाठी सरकारातुन पैसा मिळे.[२३]

शिवकाळातील शेती ही प्रामुख्याने जीराईत आणि बागायत अशा स्वरुपाची होती. जीराईत शेती ही पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबुन होती. तर बागायती शेती ही विहीर आणि पाटाच्या पाण्यावर अवलंबुन होती.[२४]

शिवकाळातील शेतक-याना सर्वस्वी पावसावर अवलंबुन रहावे लागे. बागायती क्षेत्र कमी असल्यामुळे पाउस झाला नाही तर शेतक-यास दुष्काळा सारख्या संकटाना तोंड द्यावे लागे. पाउस झाला आणि जमीन पेरणीस योग्य झाली म्हणजे कुठल्याही परिस्थीतीत शेतक-याला शेताकडे धाव द्यावी लागे आणि काबाडकष्ट करुन पिकविलेले शेत जनावरे, शत्रुचे हल्ले आणि पक्षी यांच्या पासुन बचावावे लागे.[२५]

## प्राचीन आणि मध्ययुगीन महाराष्ट्रातील ग्रामसेवक :

शेती हा प्राचीन महाराष्ट्रातील एक व्यवसाय असला तरी शेतक-याला इतर व्यवसायावर देखील अवलंबुन रहावे लागत असे. शेतकरी शेतीची कामे लोहार, चांभार आणि सुताराच्या मदतीशिवाय करु शकत नसे. तसेच शेतक-याप्रमाणे गावकरी सुध्दा चांभार, न्हावी, कुंभार ,

धोबी, यांच्या सेवेवर अवलंबुन असत. अशाप्रकारे शेतकरी व गावाच्या गरजापूर्ण करणारे व्यवसायिक प्राचीन काळापासून अस्तीत्वात होते. चाणक्याने याना समाजाचे सेवक म्हटले आहे.[२६]

अशाप्रकारच्या योजनेमुळे प्राचीन महाराष्ट्रातील खेडी ही स्वयंपूर्ण झाली होती. या व्यवसायिकाना त्यांच्या सेवेच्या मोबदल्यात दरवर्षी धान्याचा कांही वाटा देण्यात येण्याची हमी होती. अशाप्रकारे या व्यवसायिकाना वार्षीक उत्पन्नाची हमी असे. याच पध्दतीला मध्ययुगीन काळात बलुतेपध्दती म्हणण्यात येउ लागले.[२७]

अनेक विद्वानानी या पध्दतीच्या उगमाविषयी अनेक तर्क बांधलेले आहेत. बेडन पॉवेलच्या मते बलुतेदारीची पध्दत ही द्रवीडांच्या कडून आर्यानी उचलली. पण आळतेकराना हे मत मान्य नाही. त्यांच्या-मते बलुतेदार पध्दती ही भारतात आर्यानीच सुरु केली. आर्यानी जेंव्हा वसाहत करण्यास सुरुवात केली त्यावेळी आर्यलोक जंगली जनावरानी आणि शत्रुटोळयानी व्यापलेल्या प्रदेशात वसाहत करु लागले. तेंव्हा अशी ही खेडी जास्तीत जास्त स्वयंपूर्ण असली पाहीजेत याकडे त्यांचा कटाक्ष असे. खेडयाला स्वयंपूर्ण बनविण्यासाठी तेथील शेतीच्या आणि इतर गरजा पूर्ण करणारे ग्रामसेवक असणे गरजेचे होते. ग्रामसेवकांना गावात ठेवण्या-साठी त्यांच्या उत्पन्नाची कांही तरतूद करणे अत्यंत आवश्यक होते. यातूनच बलुतेदारी पध्दतीचा उगम झाला. ग्रामसेवकांना त्यांच्या सेवेच्या मोबदल्यात दरवर्षी धान्याच्या रुपाने मोबदला दिला जाई. मोबदला धान्याच्या स्वरुपात देण्याचे कारण असे की, प्राचीनकाळी नाण्याचा वापर फार मोठ्या प्रमाणावर होत नसे. त्याचप्रमाणे पशुधन हे

शेतक-याना अत्यंत प्रिय होते• त्यामुळे सेवेच्या मोबदल्यात पशुधन देणे त्यांना शक्य नव्हते• त्यामुळे ग्रामसेवकांच्या सेवेचा मोबदला देण्यासाठी धान्याचा वापर करणे हाच एकच पर्याय प्राचीन काळी शेतक-यापुढे होता• अशा प्रकारे बलुतेपध्दतीचा उगम झाला आहे असे अळतेकरांचे मत आहे•[२८]

प्राचीन काळातील अनेक ग्रामसेवकांचे उल्लेख पहावयास मिळतात• त्यामध्ये प्रामुख्याने सोनार, सुतार, कुंभार, लोहार इत्यादींचा समावेश होता•

सो ना र :

प्राचीन महाराष्ट्रात सोनाराचा व्यवसाय करणारे लोक होते• सोपारा या प्राचीन महाराष्ट्रातील ठिकाणी सापडलेल्या इ•स•नाच्या दुस-या शतकाच्या अवशेषावरुन सोने, चांदी, पितळ यांचे व्यवसाय उत्कर्षाला पोहचले होते असे आढळून येते• या अवशेषा विषयी असे म्हटंले आहे की,

"The brass gods are excellent castings, sharper and truer than modern Hindu brassware. The skill of the gold and Silversmiths is shown in the finely stamped Silver Coin, in the variety and grace of the gold flowers, and in the shape and tracery of the small central gold casket."

अमरावती येथे सापडलेल्या लहान सोनेरी डबीवरुन प्राचीन काळात महाराष्ट्रात सोन्याच्या कामात बरीच प्रगती झाली होती हे जाणवते.[२९]

कंठ, हार, कर्णभूषणे, वलपे, मेटक्का, नुपुर, कंकणे असे सर्वप्रकारचे दागीने त्याकाळी स्त्रिया वापरीत असून लेण्यातील चित्रात ते पहावयास मिळतात.[३०]

महाराष्ट्रातील कल्याण शहरात बरेच सोनार रहात होते. कान्हेरी येथील लेखात एका सोनाराने दान दिल्याचा उल्लेख आहे.[३१] जवाही-याचा व्यवसाय करणारी मंडळी प्राचीन महाराष्ट्रातून आढळून येत असत. पैठण येथे झालेल्या उत्खननात कांही प्रकारची जवाहीरे आढळून आलेली आहेत.[३२] वरील माहितीवरुन प्राचीन काळी सोनाराचा आणि जवाहिराचा व्यवसाय होता हे समजून येते. प्राचीन काळाप्रमाणे यादव काळात सुध्दा सोनाराच्या व्यवसाय चालत असे.

देवगिरी ही जवाही-याच्या व्यापारासाठी प्रसिध्द होती. तेथे हिरे माणकांना पैलु पाडण्याच्या कामाप्रमाणे सोन्या-चांदीची आणि इतर बरीच कलाकुसरीची कामे सुबक होत असत. निरनिराळ्या प्रकारचे सोन्याचांदीचे अलंकार घडवून त्यावर होणारी कलाकृति आणि जवाहिराला पैलु पाडण्यासाठी नाजुक कलाकुसरीची कामे करण्यात दौलताबाद आणि नंदुरबारचे कारागीर अतिशय कल्पक कुशल होते असे दिसते.[३३]

यादवकाळाप्रमाणे सोनाराचा व्यवसाय हा शिवकाळात होता

असे दिसते. सोनार नाणी पारखण्याचे काम करीत असत.[३४]

लो हा र :
-------

लोहाराचा व्यवसाय हा प्राचीन काळी अस्तीत्वात होता. प्राचीन वाङ्मयात त्याचा उल्लेख कम्मार, लोहंगार लोहवनिय असा आहे. शेतीसाठी हा कारागीर आवश्यक असल्याने सुगीच्या हंगामानंतर शेतक-याकडून त्याला एकूण उत्पन्नापैकी कांही वाटा मिळे.[३५] प्राचीन काळाप्रमाणे लोहाराच्या व्यवसायांचे उल्लेख यादवकाळात दिसून येतात. लोहाराला ग्रामसमितीच्या पंचकारुकीमध्ये महत्वाचे स्थान होते. अनुभवी व्यक्तीला या पंचकारुकी मध्ये पंच म्हणून काम करता येत असे.[३६] शिवकाळात लोहार हा व्यवसायिक गावकीच्या कामातील महत्वाचा बलुतेदार होता.[३७]

चां भा र :
-------

चांभार किंवा चर्मकाराचा व्यवसाय देखील प्राचीन महाराष्ट्रात होता असे प्राचीन शिलालेख सुचवितात. परंतु या व्यवसायाविषयी प्राचीन काळातील विस्तृत अशी माहिती मिळत नाही.[३८] यादवकाळामध्ये चांभाराचा व्यवसाय मोठया प्रमाणात चालत असे. चामडे कमाविण्याचा धंदा महाराष्ट्रात भरभराटीचा होता. पाण्याच्या मोटा, पखाली, पादत्राणे बनविण्याकरीता चामडयाचा उपयोग होत असे. कमविलेले कातडे ठाणे बंदरातून परदेशी रवाना होत असे. कमविलेल्या कातडयाचे मउ पट्टे विणून केलेले नक्षीकाम, त्यावरच्या वेलपट्टया, जनावरांची, पक्षांची

चिन्हे इत्यादी गोष्टीत दौलताबाद व नंदुरबारचे कारागीर कुशल होते अशी माहिती मिळते.[३९] शिवकालातील बलुतेदार यादीमध्ये चांभाराचे स्थान हे व्यावसायिक दृष्टया महत्वाचे होते. चांभाराची व्यावसायिक खूण टोचा आणि दोरा अशी होती.[४०]

## सु ता र :

सुताराचा व्यवसाय प्राचीन काळी अस्तीत्वात होता.[४१] सुताराची कारागीरी वरच्या थरापर्यंत पोहचली होती.[४२] यादव काळात सुताराच्या व्यवसायाला महत्व होते. कित्येक कसबी सुतार जहाज बांधणा-या गोदीत सुतारकीच्या व्यवसायात गुंतलेले असत. त्याचबरोबर यादवकाळात मालवहातुकीचे साधन हे बैलगाडी असल्याने या बैलगाडया तयार करण्याचे काम सुताराकडे असे.[४३] शिवकाळात सुताराचा व्यवसाय महत्वाचा होता. त्यांची गावक-याला गरज असे.[४४]

## कुं भा र :

कुंभाराचा व्यवसाय प्राचीन महाराष्ट्रात अस्तित्वात होता. नाशिक येथे कुंभाराच्या श्रेणी अस्तित्वात होत्या आणि या श्रेणी लोकांच्याकडून ठेवी स्वीकारत असत.[४५] यादवकाळात सुतार, चांभारा-प्रमाणे कुंभाराचा देखील व्यवसाय होता असे म्हटले आहे.[४६] कुंभाराला गावातून असणा-या पंचकारुकीमध्ये महत्वाचे स्थान होते.[४७]

वरील सर्व माहितीवरुन पेशवेपूर्व काळातील गावांत असणा-या

महत्वाच्या ग्रामसेवकांचे (बलुतेदारांचे) स्थान समजून येते. वरील व्यवसायिकाना गावातील न्यायनिवाड्याच्या कामामध्ये भाग घेता येत असे. न्यायनिवाडयाचे काम करणारी संस्था म्हणजे "पंचकारुकी" होय. या पंचकारुकीमध्ये कुंभार, सुतार, लोहार न्हावी आणि परीट इत्यादी जातीचा समावेश होत असे. कृषीप्रधान खेड्याचा प्रमुख आधार जो शेतकरी त्याच्या व्यावसायिक व प्रापंचीक गरजा भागविण्यासाठी आणि शेतक-याची वर्षभर पडतील ती कामे करण्याच्या मोबदल्यात शेतकरी कारागीरांना शेतातील पिकांचा ठराविक हिस्सा देत असत. यालाच "बलुते" म्हटले ■ जाई. गांव जर मोठा असेल तर गावातील बलुतेदारामध्ये कारणपरत्वे थोडा फार बदल दिसून येतो.[४८]

ग्रामीण जीवनात अत्यावश्यक असे पाच ते सात बलुतेदार पहिल्यापासून सर्वत्र असत. परंतु ती संख्या ही ज्ञानेश्वर आणि नामदेवाच्या काळात अठरावर गेली होती. परंतु हे अठरा बलुतेदार कोणते होते याविषयी माहिती मिळत नाही. ग्रामजीवनातील मुलभूत गरजा भागविणारे कारु मध्ययुगात वतनदार बनून गावकीची कामे आत्मीयतेने करीत होते.[४९]

शिवकाळामध्ये गावकामगार, वतनदार मंडळी आणि मिरासदार यानंतरचे मानकरी हे बलुतेदार होत. गावच्या स्थैर्यासाठी आणि अभ्युदयासाठी हे बलुतेदार फार मोलाची कामगिरी करीत असत. ख-या अर्थाने ते ग्रामसेवक होते. त्यांना गावक-याकडून कामाच्या मोबदल्यात पिकाचा हिस्सा मिळे. सुगीच्या वेळी मिळणा-या मोबदल्याला "बलुता" म्हटले जाई. बलुता म्हणजे गावचे कारागीर आणि सेवक यांच्या

उदरनिर्वाहासाठी गावाने दिलेला मोबदला होय.[५०]

शिवकाळात बलुतेदारांची अ.रा.कुलकर्णी यांनी खालीलप्रमाणे विभागणी केली आहे. सुतार, लोहार, न्हावी, कुंभार, धोबी हे कारागीर आणि व्यावसायिक मोडत असून सेवक वर्गात महार, तराळ, मांग, रामोशी इत्यादी लोकांचा समावेश होत असे. तर तिसरा वर्ग हा धार्मीक सेवा करणा-यांचा होय. यामध्ये जोशी, गुरव, ठाकूर, मुल्लाणा, जंगम इत्यादी जातीतील लोकांचा समावेश होत असे.[५१]

बलुतेदार पध्दती विषयी अनेक लेखकांनी आपली मते मांडलेली आहेत. मार्क्सने " This dozen of individuals is maintained at the expense of the whole community ". असे म्हटले आहे. तसेच बेडन पावेल यांनी कारागीर आणि चाकर यांना ठरावीक वस्तुरुपाने मेहनतांना देऊन अथवा सारामुक्त जमीन देऊन त्यांच्या मोबदल्यात गावची सेवा करुन घेण्याची प्रथा भारतात फार पुरातन काळापासून चालत आलेली आहे असे म्हटले आहे. मॅक्स वेबर या जर्मन शास्त्रज्ञाने ग्रामसेवकांच्या वरील प्रकारच्या चाकरीला " Demiurgic mode of employment " असे नांव दिले आहे. ग्रामसेवक हेच गांवचे भुदास लोक. हा वेबरचा डेमीअर्जीकल सिध्दांत डब्ल्यु.एच.वायझर यांना मान्य नाही. त्यांनी आपल्या " दि हिंन्दु जजमाणी सिस्टीम " या ग्रंथात जजमाणी आणि यजमाणी पध्दती आणि हक्क हे परस्पर संबंध दर्शविणारे आहेत असे म्हटले आहे. डॉ.हिरोशी फुकाजावा यानी आपल्या " १८ व्या शतकातील महाराष्ट्रातील ग्रामसेवक " या ग्रंथात जजमाणी पध्दत ही

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

पुरोहिताला लागू पडेल. पण बारा बलुतेदाराना ती लागू करता येणार नाही असे म्हटले आहे.[५२] शेतीव्यवसाय आणि वरील महत्वाच्या व्यावसायिकाबरोबर पेशवेपूर्वकाळात कांही इतर व्यवसायाचाही समावे होता. त्यामध्ये प्रामुख्याने तेली, वाणी, माळी, कोळी, पाथरवट, अत्तार, गवंडी, धान्यविकणारे, वैद्य, हस्तीदंतांचा व्यवसाय करणारे, चित्रकार, नौकानयन, मल्लविद्या, इत्यादी व्यवसायांचा समावेश होतो.

कोळ्यांचा व्यवसाय प्राचीन महाराष्ट्रात अस्तित्वात होता. नाशिक येथील दोन शिलालेखात चेतीका जमातीतील भुदास नावाच्या मच्छिमाराने गुहेला देणगी दिली होती असा उल्लेख आहे.[५३] शिवकालात कोळ्याला पखाली अथवा पाणी वाहणारा असे म्हटले आहे.[५४]

माळयाचा व्यवसायदेखील प्राचीन महाराष्ट्रात होता. गाथा सप्तशती या ग्रंथात लोकांनी फुले विकणा-यास " मालारीका " म्हटले जाई असा उल्लेख आहे.[५५] शिवकाळात माळयाला बागवान म्हटले जाई.[५६]

प्राचीन महाराष्ट्रात सुगंधी द्रव्ये विकणा-यांचा व्यवसायही अस्तित्वात होता. सुगंधी द्रव्यास दख्खनमध्ये बरीच मागणी असल्यामुळे त्यांचा व्यवसाय वाढलेला होता. सुगंधी द्रव्ये विकणा-याला गंधीक म्हणत असत. कार्ले येथील एक शिलालेखात धन्यकटक येथील गंधीकाने केलेल्या दानाचा उल्लेख सापडतो. पितळखोरा येथील शिलालेखात प्रतिष्ठानचे (पैठणचे) रहिवासी असणा-या एका गंधीकाच्या कुटुंबाने खांबाचे दान दिल्याचे उल्लेख सापडतात. याचप्रमाणे अमरावती शिलालेखात

गंधीकाने केलेल्या दानांचा उल्लेख आहे.[५७] गंधीकाच्या श्रेणी असत असा उल्लेख सातवाहन कालीन शिलालेखात आढळतो.[५८] यादवकाळातील महाराष्ट्रातही सुगंधी द्रव्याच्या व्यापाऱ्यांचा व्यवसाय होता.[५९]

प्राचीन काळातील गवळी, तेली, वाणी या व्यावसायिकासंबंधी माहिती मिळते. अजंठा येथील एका चित्रात राजकुमार वसुंधर हा बाजारातुन जात आहे. असे दाखविणाऱ्या चित्रात तीन दुकाने दिसतात. पहिले दुकान हे गवळ्याचे आहे. त्याच्याकडे दोन भांडी दिसतात. दुधाचे लहान भांडे व दहयाचे मोठे भांडे दिसते. दुसऱ्या दुकानात एक तेली लहानशा कपामध्ये तेल ओततांना दिसतो. तर तिसऱ्या दुकानात वाणी कांही वस्तुचे वजन करताना दिसतो.[६0] यावरुन प्राचीन काळी गवळी, तेली, वाणी, इत्यादी व्यवसायिकांचे अस्तीत्व जाणवते. यादवकालीन महाराष्ट्रातील वाण्याच्या व्यवसायासंबंधी माहिती मिळते. शेतात धान्य, मिरची, कापुस इत्यादी माल पिकत असला तरी तेल, मीठ, कापड वगैरे वस्तूची गरज बहुतेक वाणी भागवत असत. तसेच आपल्या व्यवसायाबरोबर सावकारीचा व्यवहार ही ते करीत असत. "शेताची पाटी" या सारख्या वस्तु गहाण ठेवून वाण्याकडून कर्जाउ पैसा मिळे.[६१] तेल्याच्या व्यवसायांचेही उल्लेख आढळतात. कोरीव लेखात आणि महानुभव वाङमयात तेल्याचे बरेच उल्लेख आहेत. त्यानी वापरलेले हातघाणे आणि बैलघाणे, उत्पादन केलेले तिळेल, एरंडेल, खोबरेल वगैरे नित्योपयोगी तेले आणि विलासी श्रीमंत लोकाकरीता काढलेली चापेलीसारखी सुगंधीत तेले लक्षात घेतली तर तेल्याचा धंदा तेजीत होता असे वाटते. गावातील गौळणी दही, लोणी विकत असत.[६२] शिवकाळात सुध्दा तेल्याचा उल्लेख आढळतो.[६३] धान्य

विक्रीचा व्यवसाय करणारे लोक प्राचीन महाराष्ट्रात होते. जुन्नर येथील एका शिलालेखात धान्य विक्री करणा-या एका श्रेणीने गुहेची देणगी बुध्द संस्थेला दिली असा उल्लेख सापडतो.[६४]

यादवकाळात कपडे शिवण्याचा व्यवसाय करणा-या शिंप्याची एक स्वतंत्र जातच होती. त्या जातीतील एक प्रमुख संत नामदेव हे यादव काळातीलच होत. मापासाठी शिंप्याला एक अंगी देऊन दुसरी नवीन शिवल्याची किंवा जुना कपडा फाडून निराळे कपडे बनविल्याबद्दल शिवणावळीचे पैसे शिंप्याला दिल्याचे दाखले म्हाईमभटाने दिले आहेत.[६५] शिवकालीन महाराष्ट्रात शिंप्याचा जातीचा उल्लेख सापडतो.[६६]

इतर व्यवसायाप्रमाणे प्राचीन महाराष्ट्रातील वैद्य व्यवसायाचीही माहिती मिळते. गाथा सप्तशती या ग्रंथात ज्या गावांत वैद्यानाही त्या गावांत राहणे योग्य नाही असा उल्लेख आहे.[६७] बांधकाम व्यवसायात अनेक लोक गुंतलेले होते. पोहार या ठिकाणी बांधल्या जाणा-या राजवाडयासाठी महाराष्ट्रातील कांही संत्रज्ञ नेमले होते असा उल्लेख "मनीमेकलाई " ग्रंथात सापडतो. येथे बांधल्या गेलेल्या चैत्यगृहासाठी पाथरवट लोक काम करीत होते.अशी माहिती मिळते.[६८]

विणकरांचा व्यवसाय प्राचीन काळी अस्तीत्वात होता आणि तो भरभराटीस आला होता. नगर किंवा तेर या ठिकाणी 'मलमल' आणि इतर प्रकारचे कापड बनविले जात असे. अपरांत किंवा उत्तर कोकणात देखील कापडाचे उत्पादन होत असे.[६९] यादवकाळात महाराष्ट्रात तयार होणारे मलमली, मखमली, रेशमी वगैरे सर्व प्रकारचे कापड भारतात सर्वत्र

विकले जात असे. पुरातन काळापासून " पैठण, नगर, ठाणे, चौल इत्यादी ठिकाणे कपडयाच्या विणकाम व्यवसायाविषयी प्रसिध्द होती. १३ व्या शतकात पैठण, ठाणे, चौल ही नावाजलेली शहरे होती. एका ठाणे शहरात ५,000 विणकर मखमलीचे कापड तयार करण्यात गुंतलेले असत. चौल येथे सुती, तलम प्रकारचे कापड तयार होई. ब-हाणपूर येथे तयार होणा-या कापडाला अरबस्थान, इराक, पाकीस्तान, इजिप्त इत्यादी देशातून मागणी असे. भक्कम रेशमानी विणलेल्या जरतारीचे नक्षीकाम केलेल्या पैठण्यांची ख्याती पूर्वापार चालत आली होती.[७0]

शिवकाळात चौलला रेशमाचा मोठा धंदा होता. भिवंडी येथे विणकरांचा धंदा तेजीत होता. इंग्रज लोकांनी अनेक विणकरांना मुंबईला येण्याची विनंती केली होती.[७१]

वरील सर्व माहितीच्या आधारे पेशवे पूर्व काळातील महाराष्ट्रातील अनेक व्यवसायीकांची माहिती मिळते. तसेच अनेक व्यवसायिक अस्तीत्वात होते असे दिसते. प्राचीन व मध्ययुगीन महाराष्ट्रात शेती हा प्रधान व्यवसाय होता. पण शेतीला इतर कांही कारागीर व धंद्यावर अवलंबून राहावे लागे. शेतीची अवजारे, बैलगाडी, नांगर इत्यादी शेतीच्या मूलभूत गरजासाठी शेतक-याला सुतार, लोहार, कुंभार इत्यादी लोकावर अवलंबून राहावे लागे. यामुळे खेडयात अनेक ग्रामसेवक निर्माण झाले. पुढे याच पध्दतीला बलुतेदारी म्हणण्यात येऊ लागले. लोकांच्या इतर गरजा पु-या करणारे वाणी, कुंभार, विणकर इ. व्यवसायांचा देखील उगम झाला व त्यांचे अस्तित्व पेशवेकाळापर्यंत टिकून राहिले. प्राचीन काळापासून जाती व व्यवसाय हे एकमेकांशी अत्यंत निगडीत होते. वरील

सर्व व्यवसायिकांच्या विशिष्ठ जाती होत्या. जातीवरून व्यवसाय निर्माण झाले की व्यवसायावरून जाती तयार झाल्या हे सांगणे कठीण आहे. पण ठराविक जातीतील लोकांनी ठराविक व्यवसाय करावेत हे समीकरण प्राचीन कालापासून ठरुन गेले. उदा. सुतार काम करण्याचा अधिकार फक्त सुतार जातीलाच होता व मातीची भांडी तयार करण्याचा अधिकार फक्त कुंभार जातीलाच होता. सुताराला कुंभाराचा व्यवसाय करण्याचा हक्क नव्हता व कुंभाराला सुताराचा व्यवसाय करण्याचा हक्क नव्हता. तसे केल्यास वाद निर्माण होत व गुन्हे दाखल केले जात. नेलफील्डसारख्या समाजशास्त्रज्ञाच्या मते जातीजातीतील भेदांचा व्यवसाय हा एकमेव पाया होता. इतर विद्वानांच्या मते जाती व्यवस्थेच्या निर्मितीत वंशपरंपरागत व्यवसाय हा महत्वाचा घटक होता.[७२] अशाप्रकारे महाराष्ट्रात विविध व्यवसायिक जाती निर्माण झाल्या. व्यवसाय व जाती यांचे घनिष्ठ संबंध फार काळ टिकून राहिले. जातीना एकाचवेळी सामाजिक व आर्थिक अशा बाजू होत्या.

-x-x-x-x-x-

संदर्भ :


१. Ranade N.B., The Twentieth Century English Marathi Dictionary, Reprint, Poona-1977. Vol.II, P.P.1330,1521.

२. Das Dipakranjan, Economic History of the Deccan,P.13.

३. डॉ.सहस्त्रबुध्दे,पुरुषोत्तम गणेश, महाराष्ट्र संस्कृती, पृ.२०६.

४. किस्ता. पृ.२०६-७.

५. Das Dipakranjan, OP. Cit., P.95.

६. डॉ.सहस्त्रबुध्दे पु.ग., महाराष्ट्र संस्कृती, पृ.२०७.

७. Das Dipakranjan, OP. Cit., P.96.

८. किस्ता. पृ.९७.

९. किस्ता, पृ.९८.

१०. किस्ता, पृ.९८-१०१.

११. किस्ता, पृ.१००-१०१.

१२. किस्ता, पृ.१०१.

१३. किस्ता, पृ.१०२.

१४. सहस्त्रबुध्दे पु.ग., महाराष्ट्र संस्कृती, पृ.२०७.

१५. शेणोलीकर, देशपांडे, महाराष्ट्र संस्कृती, घडण आणि विकास, पृ.९५.

१६. पानसे एम.जी., यादवकालीन महाराष्ट्र, पृ.९४.

१७. शेणोलीकर, देशपांडे, महाराष्ट्र संस्कृती, घडण आणि विकास, पृ.९५.

१८. पानसे एम्.जी., यादवकालीन महाराष्ट्र, पृ.९६.

१९. शेणोलीकर, देशपांडे, महाराष्ट्र संस्कृती, घडण आणि विकास,पृ.९६

२०. पानसे एम्.जी., यादवकालीन महाराष्ट्र, पृ.९९.

२१. कुलकर्णी अ.रा., शिवकालीन महाराष्ट्र, पृ.९.

२२· कित्ता, पृ·५६·

२३· कित्ता, पृ·५८·

२४· कित्ता, पृ·६९·

२५· कित्ता, पृ·५९-६०·

२६· Altekar A.S., A History of Village Communities in the Western India, P.89.

२७· Ibid, PP. 89-91.

२८· Ibid., PP. 90-91.

२९· Das Dipakaranjan, OP.Cit, P.177.

३०· सहस्त्रबुद्धे, महाराष्ट्र संस्कृति, पृ·२०८·

३१· Das Dipakzanjan, OP. Cit., P.176.

३२· Ibid., P.177.

३३· पानसे एम्·जी·, यादवकालीन महाराष्ट्र, पृ·५८,६०·

३४· कुलकर्णी अ·रा·, शिवकालीन महाराष्ट्र, पृ·४०·

३५· Das Dipakranjan, OP. Cit., 175.

३६· पानसे एम्·जी·, यादवकालीन महाराष्ट्र, पृ·८२·

३७· कुलकर्णी अ·रा·, शिवकालीन महाराष्ट्र, पृ·३८·

३८· Das Dipakranjan, Op. Cit., P.186.

३९· पानसे एम्·जी·, यादवकालीन महाराष्ट्र, पृ·६०·

४०· कुलकर्णी अ·रा·, शिवकालीन महाराष्ट्र, पृ·३८, ४१·

४१. Das Dipakranjan, OP. Cit., P.81.

४२. सहस्त्रबुध्दे पु.ग., महाराष्ट्र संस्कृति, पृ.२८९.

४३. पानसे एम्.जी., यादवकालीन महाराष्ट्र, पृ.६०,६१.

४४. कुलकर्णी अ.रा., शिवकालीन महाराष्ट्र, पृ.३८.

४५. Das Dipakranjan, OP. Cit., P.181.

४६. पानसे एम्.जी., यादवकालीन महाराष्ट्र, पृ.५८, ५९.

४७. कित्ता, पृ.८२.

४८. कित्ता, पृ.८२-८३.

४९. पानसे एम्.जी., यादवकालीन महाराष्ट्र, पृ.८३.

५०. कुलकर्णी अ.रा., शिवकालीन महाराष्ट्र, पृ.३७.

५१. कित्ता, पृ.३८, ३९.

५२. कित्ता, पृ.४१, ४२, ४३.

५३. Das Dipakranjan, OP. Cit., P.190.

५४. कुलकर्णी अ.रा., शिवकालीन महाराष्ट्र, पृ.४०..

५५. Das Dipakranjan, Op. Cit., P.180.

५६. कुलकर्णी अ.रा., शिवकालीन महाराष्ट्र, पृ.४०.

५७. Das Dipakranjan, Op. Cit., P.182.

५८. सहस्त्रबुध्दे पु.ग., महाराष्ट्र संस्कृति, पृ.२११.

५९. पानसे एम्.जी., यादवकालीन महाराष्ट्र, पृ.५९.

६०. Das Dipakranjan, Op. Cit, P. 182

६१. पानसे एम्.जी., यादवकालीन महाराष्ट्र, पृ.८६-८७.

६२. कित्ता, पृ.६१, ८६.

६३. कुलकर्णी अ.रा., शिवकालीन महाराष्ट्र, पृ.४०.

६४. Das Dipakranjan, Op. Cit, P. 191.

६५. पानसे एम्.जी., यादवकालीन महाराष्ट्र, पृ.६१.

६६. कुलकर्णी अ.रा., शिवकालीन महाराष्ट्र, पृ.४०.

६७. Das Dipakranjan, Op. Cit, P. 187.

६८. Ibid, P. 178.

६९. Das Dipakranjan, Op. Cit, P. 174.

७०. पानसे एम्.जी., यादवकालीन महाराष्ट्र, पृ.६०.

७१. कुलकर्णी अ.रा., शिवकालीन महाराष्ट्र, पृ.११०-११२.

७२. Desai S. V., Social Life in Maharashtra under the Peshwas, PP. 31, 32.

=0=0=0=0=0=